## ऊर्जा राज्यमंत्री ना.डॉ. सुनिल देशमुख यांची कोळसा प्रश्नावर नागपूर येथे बैठक

महाराष्ट्र राज्य विधानसभेतील आश्वासनांच्या अनुषंगाने, महानिर्मितीच्या वीज केंद्रांना पुरविण्यात येणारा 'कोळसा' हा निकृष्ट दर्जाचा असल्याने त्याचा वीज उत्पादनावर विपरीत परिणाम होतो तसेच जनसामान्यांमध्ये गैरसमज निर्माण होतात या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विधानसभेचे पावसाळी अधिवेशन संपल्याबरोबर लगेचच नागपूर येथे संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात येईल असे ऊर्जाराज्यमंत्री ना.डॉ.सुनील देशमुख यांनी विधानसभेत सांगितले होते. त्याअनुषंगाने १७ जून २००९ रोजी विद्युत भवन, नागपूर येथे मान्यवर आमदार, महानिर्मिती, वेस्टर्न कोल फिल्ड लि.चे अधिकारी यांची संयुक्त बैठक संपन्न झाली.



या संयुक्त बैठकीला ना.डॉ.सुनील देशमुखांसह माननीय आमदार श्री.सुधीर मुनगंटीवार, श्री.देवेंद्र फडणवीस, श्री.जैनुद्दीन झवेरी, वेकोलीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री.दिनेशचंद्र गर्ग, महानिर्मितीचे संचालक (संचलन) श्री.मधुकर शेलार प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रारंभी सर्व मान्यवरांचे महानिर्मितीच्यावतीने श्री.मधुकर शेलार यांनी स्वागत केले. यानंतर 'कोळसा' या विषयावर आधारीत संगणकीय सादरीकरण उपस्थितांना दाखविण्यात आले. याप्रसंगी मान्यवर तिनही आमदारांनी अधिकारीवर्गास विधायक सूचना दिल्या तर नामदार डॉ.सुनिल देशमुख यांनी परंपरागत कार्यपद्धतीत सुधारणात्मक बदल करून कृती आराखडा तयार करण्यात यावा असे सुचविले. तसेच कोळशाची वाहतूक, गुणवत्ता तपासणी याकरिता महानिर्मिती व वेकोलिने संयुक्तरित्या अधिकाधिक प्रयत्न करावे असे सांगितले. महानिर्मितीला चांगल्या प्रतीचा कोळसा व जास्तीत जास्त कोळसा पुरवठा व्हावा यादृष्टीने त्यांनी उपयुक्त मार्गदर्शन केले.

सदर बैठकीला वेकोलिचे सर्वश्री.बी.के. सक्सेना - संचालक (तांत्रिक) संचलन, मिश्रा-मुख्य महाव्यवस्थापक, रेड्डी - मुख्य महाव्यवस्थापक, तिवारी - मुख्य महाव्यवस्थापक, नारायण-महाव्यवस्थापक, कटकवार तर महानिर्मितीकडून सर्वश्री. विजय सिंह-प्रभारी कार्यकारी संचालक (निसंवसु), सदाशिव पाटील-मुख्य महाव्यवस्थापक (इंधन), शशिकांत डोंगरे- मुख्य महाव्यवस्थापक, ज्ञानेश्वर थुटूरकर - मुख्य महाव्यवस्थापक, नारायण बिघाने-महाव्यवस्थापक (कोल), श्रीकांत रेखडे - अधीक्षक अभियंता (कोल), अशोक पाटील - अधीक्षक अभियंता, संजय रहाटे - कार्यकारी अभियंता, ए.जी. सोनकुसरे - कार्यकारी अभियंता, किरण बडवे - उपमुख्य लेखाधिकारी, प्रताप खोत - कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ, तसेच जनसंपर्क सहाय्यक (विदर्भ) यशवंत मोहिते प्रामुख्याने उपस्थित होते.

## हर्षल चव्हाण आणि बाबासाहेब दिवेकर गुणवत्ता यादीत अव्वल:महानिर्मितीतर्फे गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांचा सत्कार



कु.बाबासाहेब दिवेकर यांच्या वतीने पुरस्कार स्वीकारताना श्री.दिवेकर.



कु.हर्षल चव्हाण पुरस्कार स्वीकारताना.

नुकत्याच जाहीर झालेल्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत उत्तुंग यश प्राप्त करून गुणवत्तायादीत झळकलेल्या चि.हर्षल प्रकाश चव्हाण आणि चि.बाबासाहेब दिवेकर या गुणवंत विद्यार्थ्यांचा महानिर्मितीतर्फे नुकताच प्रकाशगड मुख्यालय येथे भव्य सत्कार करण्यात आला.

यावेळी मुंबई विभागात (व्यवसायिक शाखा) मध्ये ९६.६७% गुण मिळवून सर्वप्रथम आलेला चि.हर्षल चव्हाण व औरंगाबाद विभागात ९३.१७% गुण मिळवून गुणवत्तायादीत तिसरा आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये सर्वप्रथम आलेला चि.बाबासाहेब दिवेकर या दोन्ही विद्यार्थ्यांचा गौरव महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक श्री.सुब्रत रथो यांचे शुभहस्ते करण्यात आला. आपला चिरंजीवांचे वतीने श्री.सूर्यभान दिवेकर यांनी पुरस्कार स्वीकारला. श्री.रथो यांचे हस्ते रोख पारितोषिक -प्रशस्तीपत्रक व पुष्पगुच्छ देऊन दोन्ही विद्यार्थ्यांचे महानिर्मितीतर्फे कौतुक करण्यात आले.

चि.हर्षल चव्हाण यांचे पिता श्री.प्रकाश चव्हाण हे महानिर्मितीच्या मुंबई मुख्यालयात लेखाविभागात रोखपाल म्हणून कार्यरत आहेत, तसेच चि.बाबासाहेब दिवेकर यांचे पिता श्री.सुर्यभान दिवेकर हे महानिर्मितीच्या मुंबई मुख्यालयात मानव संसाधन विभागात आस्थापना अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत.

सदर गुणगौरव समारंभास दोन्ही विद्यार्थ्यांचे कुटुंबिय तसेच महानिर्मितीचे संचालक (वित्त) श्री.गुलाबसिंग गिरासे, संचालक (संचलन) श्री.मधुकर शेलार, संचालक (प्रकल्प-प्रभारी) श्री.अरूण डवलेकर, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री.अरविंद चौधरी, कार्यकारी संचालक (सं. व सु. ) श्री.चंद्रकांत थोटवे, तसेच महानिर्मितीचे क्षेत्रीय कार्यालयातील मुख्य महाव्यवस्थापक, महाव्यवस्थापक व इतर अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी सर्व उपस्थितांनी या दोन्ही विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना भावी आयुष्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.

Printed & Published by Shri. Mahesh Aphale of Maharashtra State Power Generation Co. Ltd.
**Printed at Hema Arts,** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Hongkong Bank Bldg, M.G. Road, Fort, Mumbai - 400 001.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : **महेश आफळे (जनसंपर्क अधिकारी)**
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, सृजन (महानिर्मिती), प्रकाशगड, दुसरा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)